## वाचनानंद

# कल्पनेचा हिंदोळा

धगधगते अग्निकुंड बनलेल्या काश्मीरकडे गेल्या काही वर्षांपासून पाश्चिमात्य देशातील पर्यटकांनी पाठ फिरविली आहे. मात्र कोणताही झगमगाट नसलेला एका छोटेखानी तीर्थस्थानाकडे जे रोझाबाल वस्तीत वसले आहे तिथे मात्र परदेशी पर्यटकांचा ओढा वाढतच आहे. मध्यकालीन यवनी संत युझ असफ यांची समाधी रोझाबालमध्ये आहे. मात्र त्या समाधीचा येशू ख्रिस्तांच्या थडग्याशी बादरायण संबंध जोडला जाण्यासाठी कित्येक दंतकथा आहेत. अश्विन संघी यांनी शब्दबद्ध केलेला द रोझबल लाईन नावाच्या द विन्सी कोड टाईनच्या पाहिलासह हल्ली बरेच लिखाण झाले आहे आणि त्याचा परिपाक म्हणून श्रीनगरमधील या तीर्थस्थळी पर्यटकांची रीघ लागली आहे.

ही प्रसिद्धी एव्हीडी कळसाला पोहोचली की तेथील कर्मचाऱ्यांना विदेशी पर्यटकांसाठी तीर्थस्थळाचे दर्शन बंद करावे लागले अन्यथा स्थानिकांच्या भावना दुखावण्याची शमता होती. येशू ख्रिस्ताने क्रुसावरील मरणावर विजय मिळविला. काश्मीरपर्यंत प्रवास करून युझ असफ हे नाव धारण केले व त्यांना रोझाबाल येथे समाधी देण्यात आली, असे अनेक जण मानतात. हे तीर्थस्थळ व दस्तुरखुद्द अश्विन संघींचे रोमांचकारक लिखाण द रोझाबाल लाईन बऱ्याच पर्यटकांसाठी पवित्र शास्त्र म्हणून असलेल्या लोनली प्लेनेट गाईडमध्ये वर्णिले आहे आणि पाश्चिमात्यांचे सर्वस्व पुन्हा उकाळून आले.

संघीच्या या काल्पनिक कथेचा सार म्हणजे येशू ख्रिस्ताने क्रुसावरील मरणावर विजय मिळविला आणि काश्मीरपर्यंत मजल मारली. विक्रीचे नवे उच्चांक गाठत असलेल्या संघीच्या या कादंबरीतील प्रत्येक पानावर वाचक बुचकळ्यात पडतो, मात्र त्याचबरोबर लेखक हे सुद्धा विशद करतात की वाचकाने त्याकडे इतिहास म्हणून नव्हे तर एक कथा म्हणून पहावे.

जगभरातील धर्माधर्मांत असलेल्या परस्पर संबंधाविषयी जे आकर्षण आहे, तेच द रोझाबाल लाईन शब्दबद्ध होण्यामागचे प्रेरणास्थान आहे. एक धर्म दुसऱ्या धर्माशी कसा जोडलेला आहे व त्यामधील जोडले गेलेले दुवे व सांधे कसे परस्परपूरक आहेत, त्याचा पुरावा म्हणून ही कादंबरी आपल्याला मेसापोटेमिया ते मगध जेरूसालेम ते रोम येथपर्यंत फिरवून आणतो. 'भगवान बुद्ध आणि येशू ख्रिस्तांनी चाळीस दिवस उपवास केला व सात्र याबद्दल मी विस्मयचकित झाले आहे. ख्रिस्ती धर्मात दिला



जाणारा बाप्तिस्मा व कुंभ मेळ्यामधील साधर्म्य मला अतुलनीय वाटते. रोमांकित झालेले अश्विन संघी असे म्हणतात.

प्रकाशनासाठी सर्वांना [illegible] लागला. 'ह्यमला प्रकाशक मिळत नव्हते'' माहिती न लपवता ते म्हणाले, पहिली आवृत्ती त्यांना स्वखर्चाने काढावी लागली. नशिबाने टाटा वेस्टलॅण्डला या कादंबरीत काहीतरी गुण आढळला आणि आवतागावत ही कादंबरी विक्रीत आघाडीवर राहिली आहे. श्रीनगरमधील द रोझाबाल समाधीस्थळी येशू ख्रिस्तांना समाधी देण्यात आली आहे. या वादाच्या मुद्याचा गाभा म्हणजे ही